
कारकीर्दीला सुरुवात केल्यावर १९५०साली मोठ्या विशाल पार्श्वभूमीवर काम करण्यासाठी त्यांनी चित्रपटसंगीत दिग्दर्शन क्षेत्रात प्रवेश केला. देवेंद्र गोयल यांच्या *आँखे* (१९५०) या पहिल्या चित्रपटानंतर *आशियाना* या चित्रपटात राज कपूर-नर्गीसवर चित्रित करण्यात आलेल्या गाण्यात राजेंद्र किशन या प्रथम क्रमांकाच्या गीतकाराबरोबर त्यांनी जोडी जुळवली.

१९४०चा काळ हा त्यांच्यासाठी संघर्षाचा काळ होता. त्यात स्वत:ला सिद्ध करणे क्रमप्राप्त होते म्हणून की काय, मदन मोहन यांनी हलक्या आल्हाददायक आणि अधिक पाश्चिमात्य सुरावट बांधली. 'मेरा नाम अब्दुल रहमान' (*भाई-भाई*), 'मुझे नही मिलाना पास करके' (*आँखे*), 'ओ मॅडम दो से हम हो गये एक' (*आशियाना*) या त्यांच्या जातकुळीतून बाहेर पडलेले सूर प्रेक्षकांच्या हृदयाजवळ जाणारे होते. जसे 'मेरी याद में तुम ना आसू बहाना' (*मदहोश*), 'हम प्यार मे जीने वालों को' (जेलर), 'हमसे आया ना गया', 'मेरी वीना तुम बीन रोये', 'कौन आया मेरे मनके द्वारे' ही *देख कबीरा रोया* या १९५७ सालच्या चित्रपटातील गाणी होय. अमेया चक्रवर्ती दिग्दर्शित या चित्रपटात अनिता गुहा, अमिता, अनुपकुमार होते. मदन मोहन यांनी इतर प्रसिद्ध संगीतकारांप्रमाणे शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण घेतले नाही. परंतु त्यांची सूरबद्धता पाहता त्यांची सुरावट कला लक्षात राहते.

मदन मोहन यांचा जन्म २५ जून १९२४ साली त्यांचे आई-वडील सुट्टीवर असताना इराकमधील बगदाद शहरात झाला. रावलपिंडी येथे त्यांचे बालपण गेले. वडील रायबहादूर चुन्नीलाल यांना मुलाला कॉन्व्हेन्ट शिक्षित करायचे होते. म्हणून त्यांनी पुढे मुंबईला स्थलांतर केले. बॉम्बे टॉकीज आणि फिल्मीस्तान या स्टुडियो उभारणीत चुन्नीलाल यांची भागीदारी होती. चित्रपटसृष्टीत असूनही त्यांचा मदनमोहन यांना संगीतकार म्हणून प्रवेश करण्यास सख्त विरोध होता. संगीतावर आवड असून केवळ वडिलांसाठी त्यांनी भारतीय सैन्यात प्रवेश घेतला. आणि तेथून पळ काढून त्यांनी ऑल इंडिया रेडिओ, लखनऊ येथे शिरकाव केला. तेथे बडे गुलाम अली खान, बेगम अख्तर या प्रसिद्ध कलाकारांच्या संगतीत त्यांनी संगीत हेच कार्यक्षेत्र करण्याचा निर्धार केला.



लता मंगेशकर आणि मदन मोहन

त्या काळच्या प्रत्येक गीतकार, गायकाबरोबर त्यांचे चांगले संबंध होते. त्यात लखनऊपासून ओळखीचे गायक तलत मेहमूद, पार्श्वगायक होण्यासाठी मुंबईला आलेले राज खोसला

वडील चित्रपटसृष्टीत असूनही त्यांचा मदनमोहन यांना संगीतकार म्हणून प्रवेश करण्यास सख्त विरोध होता. संगीतावर आवड असून केवळ वडिलांसाठी त्यांनी भारतीय सैन्यात प्रवेश घेतला. आणि तेथून पळ काढून त्यांनी ऑल इंडिया रेडिओ, लखनऊ येथे शिरकाव केला.

शेवटी दिग्दर्शक झाले. १९६० दरम्यान स्थिर झाल्यावर खोसला यांनी *वह कौन थी?*, *मेरा साया* आणि *चिराग* या तीन चित्रपटांसाठी मित्र मदन मोहनलाच संगीतकार म्हणून घेतले.

१९४८ साली गुलाम हैदर यांनी मदन मोहन यांना बोलावून फिल्मीस्तान स्टुडिओच्या *शहीद* या चित्रपटासाठी, गायन क्षेत्रात धडपडणाऱ्या लता मंगेशकर या गायिकेबरोबर भाऊ-बहिणीवर आधारित द्वंद्व गाणं गाण्यास सांगितले. शेवटी चित्रपट आणि ध्वनिमुद्रिका या गाण्याशिवाय तयार झाला ती गोष्ट वेगळी. परंतु याच गाण्याद्वारे लता आणि मदन मोहन यांच्यात व्यावसायिक आणि वैयक्तिक संबंधाला सुरुवात झाली. लता यांच्या कार्यक्षेत्रात काही संगीतकारांबरोबर सूर जुळले नाहीत. परंतु मदन मोहन, लतासाठी नेहमीच मदन भय्या म्हणून शेवटपर्यंत राहिले.

*शहीद*द्वारे मदन मोहन यांची राजा मेहंदी अली खान या लहान आणि ज्याची कविता कधीच गायली गेली नाही अशा नवकवीबरोबर ओळख झाली. परंतु त्यांच्यामधील हुशारी मदन यांनी कवितेमधील जाणीने ओळखली. आणि त्यांनी लिहिलेलं 'वतन की राह में

नौजवान...' हे गाणं आजही वाजताना ऐकू येतं. वडिलांच्या मदतीशिवाय स्वतःच्या पायावर त्यांनी उभं रहायचं ठरवलं. त्यात त्यांचे मित्र देवेंद्र गोयल, शेखर आणि मदन मोहन यांनी चाळीत राहून परिणामी महत्त्वाच्या प्रसंगी एकच शर्ट वापरला. अशाप्रकारचे दिवस पाहिलेल्या तिघांनी एक चित्रपट तयार करायचे ठरवले. त्यात सागर यांचे लिखाण, गोयल यांचे दिग्दर्शन, शेखरचा अभिनय असा *आँखे* तयार झाला.

पहिल्याच चित्रपटात मदन मोहन यांनी आठपैकी चार गाणी खानकडून लिहून घेतली. त्यानंतरच्या *मदहोश*मधील सगळी गाणी खान यांनीच लिहिली होती. दोघेही स्थिरतेसाठी धडपडत होते. त्यात त्यांना पुन्हा एकत्र यायला बराच अवधी लागला. आणि ते एकत्र आल्यावर त्यांनी *अनपढ, आप की परछाईयाँ, वह कौन थी?, मेरा साया*द्वारे एक सूरबहार उडवून दिली. खान यांच्या अचानक मृत्यूने मदन मोहन कैफी आजमी यांच्याकडे वळले. त्यांनी चेतन आनंद यांच्या *हकीकत*साठी एकत्र काम केलं.



लता मंगेशकर आणि यश चोप्रा मदन मोहन स्मरणीत संकलित ध्वनीफीत प्रदर्शित करताना



मुलगा संजीव कोहली समवेत

लता आणि मदन मोहन यांची जोडी जमल्यावर त्या कालीन आशा भोसले, गीता दत्त, सुमन कल्याणपूर यांना त्यांच्या स्टुडिओत गाण्यासाठी प्रवेश मिळेना. मिळाला तर फक्त पाहुणे कलाकार म्हणूनच. मदन मोहन यांच्या सुरात, लताचा आवाज अगदी हृदयस्पंदन बनून श्वास घेऊ लागला. जेथे संगीतकार, संगीत संयोजक, गीतकार, निर्माता चित्रपटात गाणं बसवताना विचार करत तेथे लताच्या आवाजाला मदन कोणा दुसऱ्याबरोबर एकत्रित होऊ देत नव्हते. अगदी रफीबरोबरसुद्धा. लताचा जेथे मदन यांच्या चित्रपटात आवाज नाही असे चित्रपट अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील. त्यात *नींद हमारी ख्वाँब तुम्हारे*मध्ये आशा भोसले यांनी चार गाणी गायली. *कोई शिकवा भी नहीं, हुस्न जब जब* (रफी), *माँ का आचल* तर *कोशीश*मध्ये स्त्री पार्श्वगायन नव्हते. *एक मुठ्ठी आसमान*मधील त्यांचे संगीत सुमार दर्जाचे होते. आशाने त्यांच्यासाठी गायलेल्या गाण्यात 'झुमका गिरा रे' (*मेरा साया*), 'जिस देश से मैंने तुझको देखा है' (*परवाना*), कितनी हसीन है तेरे प्यार की नजर' (*महाराजा*)

तर पुरुष पार्श्वगायनात तलत मेहमूद त्यांचे आवडते गायक होते. त्यांनी जहाँआरासाठी तर तलतलाच घ्यायचा हट्ट धरला होता. तलतने गायलेल्या गाण्यात 'फिर वही शाम', 'मैं तेरी नजरका सुरुर हूं', 'ए सनम आज ये कसम खाये' ही गाणी होती. तर महंमद रफी यांनी गायलेल्या गाण्यात 'तुम जो मिल गये हो' (*हस्ते जख्म*), 'ये दुनिया ये महफील' (*हीर-रांझा*), 'तुमसे कहू एक बात' (*दस्तक*), 'मेरी आवाज सुनो' (*नैनीहाल*), 'तू मेरे सामने है' (*सुहागन*), 'रंग और नूर की' (*गझल*) या गाण्यांचा समावेश होता. परंतु सर्वाधिक हिट गाणी त्यांनी किशोरकुमारबरोबर दिली. 'सीमटी सी शरमाई सी' (*परवाना*), मन्ना डे- 'तुम बीन जीवन' (*बावर्ची*), महेंद्र कपूर- 'छोड कर तेरे प्यार का दामन' (*वह कौन थी?*), 'मुकेश- भूली हुई यादों (*संजोग*) ही गाणी होती.

उत्कट, भावूक अशा संगीतकार मदन मोहन यांनी बरीच पारितोषिके मिळवली होती. *दस्तक*नंतर १९६०च्या दरम्यान त्यांच्या संगीतावर टीका होऊ लागली. कारण शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण घेतलेले त्यांचे समवयस्क संगीतकार आणि काही टीकाकार उगाचच आगपाखड करू लागले. त्यादरम्यान संगीत क्षेत्रातही बरेच बदल घडू लागले होते. त्यात *लैला मजनू*नंतर तर लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्या उदयाने त्यांच्या कारकीर्दीला उतरती कळा लागली ती शेवटपर्यंत.

लता मंगेशकर यांनी त्यांच्याबद्दल एक आठवण सांगितली *मेरा साया*त राग भीमपलासीमधील 'नैनो में बदला छाये...' हे गाणे काही मनाप्रमाणे जुळून येत नव्हते. म्हणून या रागीट संगीतकाराने स्टुडियोतील काच फोडली. रक्ताळलेल्या हाताकडे दुर्लक्ष करूनही त्यांनी ते गाणं आधी पूर्ण केलं नंतर डॉक्टरजवळ गेले. अगदी पोहतानासुद्धा ते चाल बांधत. मित्रांसाठी स्वतः जेवण ते तयार करत. सर्वोत्कृष्ट ध्वनी आणि संगीत ही त्यांची आवड होती. अगदी व्यावसायापेक्षा संगीत ही आवड म्हणून त्यांनी शेवटपर्यंत जपली. ●